# पुष्परचना - भाग १५




यावेळी कप बशी वापरून रचना केली आहे. करताना मनात विचार आला.... कधी बरं कप बशी वापरायला सुरुवात झाली असेल जगात ? कोणी पहिल्यांदा तयार केली असेल? चीनमध्ये पोर्सलीनचा वापर सुरु झाला तेव्हा चहाच्या कपाची निर्मिती झाली. त्याला त्यावेळी कान नव्हते. पुढे काही दिवसाने लक्षात आले की गरम कप हातात धरायला अवघड जाते. मग कोणाला तरी कल्पना सुचली आणि कपाला कान आले. त्यानंतर बरेच वर्षांनी ब्रिटिश लोकांनी चहा बरोबर बिस्कीट खायचे तर बशीत कप ठेवला की सोईचे.... बुडवून खायला.... म्हणून कपा बरोबर बशी आली.
ही झाली कप बशीची गोष्ट!!

मुक्तरचना करताना आपल्या स्वयंपाक घरातील खूप गोष्टी पुष्पपात्र म्हणून वापरु शकतो. यावेळी कप बशी वापरून पहावी असे वाटले. तसेच फुले विकत आणण्यापेक्षा बागेतील सदाफुली आणि पिवळी शेवंती वापरली. त्याच्या जोडीला पिवळे कृत्रिम बॉल्स सोनेरी तारेला लावून फीलर्स म्हणून वापरले. नाजूक फर्न्स दोन कपांमधील कनेक्शन दाखवत आहेत, म्हणजे दोन्ही कप आणि बश्या मिळून एक रचना आहे.

रचना आवडली का? तुमचा अभिप्राय किंवा सूचना, तुमचा विचार खालील e मेलवर जरूर पाठवा.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबा इकेबाना पुणे शाखा
ई मेल asdssd@gmail.com